Recived on. 31/12/2023
1.04 p.m.

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

Seen & filed

**1. District (जिल्हा):** औरंगाबाद ग्रामीण **P.S.(ठाणे):** बिडकीन

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0481 **Year (वर्ष):** 2023

District Judge and Additional Sessions Judge AURANGABAD

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 31/12/2023 01:00

**2.**

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

**3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

**1. Day(दिवस):** गुरुवार

**Time Period (कालावधी):** पहर 5

**Date From (दिनांक पासून):** 05/10/2023
**Date To ( दिनांक पर्यंत):** 05/10/2023
**Time From (वेळेपासून):** 15:16 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 15:29 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 31/12/2023 **Time (वेळ):** 00:41 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 002
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 31/12/2023 00:41 बजे

**4. Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

**5. Place of Occurrence (घटनास्थळ):**

**1.(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 6 किमी

**(b) Address (पत्ता):** शेकटा ,पैठण **Beat No. (बिट क्र.):**

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) Name (नाव): गौरव रामकिसन भवर
(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :
(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष): 2002
(d) Nationality (राष्ट्रीयत्व): भारत
(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):
(f) Passport No.(पारपत्र क्र.):
Date of Issue (दिल्याची तारीख):
Place of Issue (दिल्याचे ठिकाण):
(g) ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पारापोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) Address (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | प्लट नं 03,जिवन ज्योती अपार्टमेंट,छ संभाजीनगर ,बिडकीन,औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | प्लट नं 03,जिवन ज्योती अपार्टमेंट,छ संभाजीनगर ,बिडकीन,औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) Occupation (व्यवसाय):
(j) Phone number (फोन नं.):
Mobile (मोबाइल नं.):

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | जितेंद्र विलास राठोड | | | 1. प्लट नं 03,जिवन ज्योती,छ संभाजीनगर ,बिडकीन, औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रानिक सामान | रेकॉर्ड प्लेअर | तीन मेमरी कार्ड | 0.00 |

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु. |
|---|---|---|---|---|
| 2 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 4000 रुपये रोख | 4,000.00 |

10 Total value of property (In Rs/-)
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

4,000.00

11. Inquest Report / U.D. case No., If any
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. First Information contents (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद दिनांक 30/12/2023

मी गौरव रामकिसन भवर वय-21, व्यवसाय -शेती, रा.शेकटा, ता.पैठण जि.छत्रपती संभाजीनगर मो.नं. 7038135050

समक्ष हजर राहुन फिर्याद लिहुन देतो की, मी वरील ठिकाणी राहत असुन माझा शेती सह अर्थ मुव्हींगचा व्यवसाय आहे. मी दिनांक 05/10/2023 रोजी ला.प्र.वि.कार्यालय, औरंगाबाद हल्लीचे छत्रपती संभाजीनगर येथे समक्ष हजर होवुन माझेकडे तलाठी अप्पा जितेंद्र राठोड मौजे सजा शेकटा ता.पैठण हे लाच मागणी करत असल्याने त्यांचेवर योग्य ती कारवाई करण्यासाठी दिलेली तक्रार खालीलप्रमाणे,

आज दिनांक 05/10/2023 रोजी मी व माझे काका श्री अर्जुन त्र्यंबक भवर वय-40 व्यवसाय- शेती, रा.शेकटा असे लाच लुचपत प्रतिबंधक कार्यालय औरंगाबाद येथे प्रत्यक्ष हजर होवुन तक्रार लिहुन देतो की, माझे काका अर्जुन भवर हे त्यांचा चुलत भाऊ विजय धोंडीराम भवर यांचे शेत गट नं.78 शिवार शेकटा येथील शेती निम्मे हिस्स्याने पाहतात. त्यांनी सदर शेतात विहीरीचे काम सुरु केले असुन विहीरीवर दगड, माती इत्यादी उपसा झालेला आहे. त्याच शेतात रस्त्यालगत चहा हॉटेलची टपरी टाकणे असल्याने विहीरीत उपसा मध्ये निघालेले दगड माती त्यांनी मला माझेकडील जेसीबी या साधनांव्दारे वाहुन आणण्यास सांगितले होते.मी त्याप्रमाणे जेसीबी क्र. एमएच 20 जीएफ 9110 या वाहनाने व हायवा भाडयाने आणलेला असल्याने मला क्रमांक सांगता येणार नाही अशा दोन वाहनाने सदर दगड व माती वाहुन नेत असतांना मला तलाठी अप्पा श्री जितेंद्र राठोड यांनी अंदाजे पंधरा दिवसापुर्वी विहीरीजवळ पकडले. त्यावेळी त्यांनी मला तुझ्यावर अवैदय गौण खनिज वाहतुक करतो म्हणुन मी तुझ्यावर कारवाई करुन तुझ्या गाडया तहसिलला जमा करतो, असे बोलले असता मी त्यांना सांगितले की, ही तर आमचीच विहीर आहे व आमचेच दगड-माती आहे, मग यात कुठली चोरी आली. त्यावेळी त्यांनी मला बरेच कायदे शिकवले, त्यामुळे मी घाबरुन गेलो व माझेवर व गाडयावर कारवाई करु नका, असे त्यांना बोललो असता त्यांनी माझेकडे दहा हजार रुपये मागितले असता मी त्यांना त्या टाईमाला माझ्याजवळ असलेले पाच हजार रुपये ज्यात पाचशे रुपये दराच्या दहा नोटा, असे दिले. तेव्हा त्यांनी मला कुठलीही दंड इत्यादीची पावती न देता ते निघुन गेले व माझ्या कामाकडे दुर्लक्ष केले.

आज दिनांक 05/10/2023 रोजी 10.00 वाजेच्या सुमारास बिडकीन येथे पैठणरोडवर मला तलाठी अप्पा जितेंद्र राठोड भेटले व मला म्हणाले की, तु बाकीचे 5 हजार रुपये दे, त्यावर मी त्यांना सांगितले की, माझे मामा येत आहे, ते आले की देवुन टाकतो, असे सांगुन वेळ मारुन नेली.

आज तलाठी अप्पा जितेंद्र राठोड हे त्यांचे कामानिमित्त शेकटा येथे आले असुन ते गावात आहेत.त्यांचेकडे इतर गावांचाही चार्ज आहे.ते कार्यालयात कमी व बाहेर त्यांचे खाजगी गाडीने फिरुन काम करण्याचे सवयीचे आहेत. त्यामुळे ते आज कार्यालयात किंवा गावात इतरत्र कोठेही भेटु शकतात.मला तलाठी अप्पा जितेंद्र राठोड यांना वरील प्रमाणे कारवाई न करण्यासाठी बक्षिस म्हणुन मागितलेली लाच रुपये पाच हजार दयावयाची इच्छा नाही व मला ऑनलाईन न्युजव्दारे आपल्या कार्यालयाची माहिती असल्याने मी येथे त्यांचेविरुध्द लाच मागणीची तक्रार देण्यासाठी आलो आहे. माझी तलाठी अप्पा जितेंद्र राठोड यांचेशी कोणतीही वैयक्तीक वैर व दुश्मनी नाही, तसेच माझा त्यांचेशी कोणताही आर्थिक व्यवहार नाही.तरी तलाठी अप्पा श्री जितेंद्र राठोड यांनी वरील गोष्टीसाठी माझेकडे लाच म्हणुन दहा हजार रुपये मागुन त्यांनी यापुर्वी माझेकडुन पाच हजार रुपये स्विकारलेले असुन आता पुन्हा रुपये पाच हजार मागत आहेत, म्हणुन त्यांचेविरुध्द तक्रार असल्याने आपण त्यांचेवर आपण कायदेशीर कारवाई करावी.अशी मी



CS CamScanner

तक्रार दिल्यानंतर सापळा अधिकारी राहुल फुला पोलीस निरीक्षक यांनी दिनांक 05/10/2023 रोजीच लाच मागणी पडताळणी कारवाई केली असता त्यात लोकसेवक श्री जितेंद्र राठोड तलाठी अप्पा सजा शेकटा ता.पैठण यांना मी 15.16 वा फोन करुन पंच क्र.1 यांचेसह मुकाई पेट्रोलीयम पेट्रोल पंप, शेकटा रोड ता.पैठण येथे त्यांचे सुचनेनुसार भेटण्यास गेलो असता त्यांनी पंच क्र.1 श्री महेंद्र डांबे यांचेसमक्ष माझेकडे माझे दगड माती वाहतुक कामाबाबत चर्चा केली व दया पाच हजार अशी लाच मागुन तडजोड अंती 4000/- रुपये लाच ठरवुन सोबत आणले नाही का? असे विचारले. माझे कामासह त्याने त्यावेळी पंच डांबे यांची सुध्दा विचारपुस केली असुन इतर गोष्टी सुध्दा बोलला आहे. एकदरीत त्याने आमचेकडे संशयाने पाहत असुन तो चलाख असल्याचे दिसुन आले. आम्ही तलाठी अप्पा यांना आता सोबत पैसे नसुन आणुन देतो असे सांगुन तेथुन निघुन 15.29 वा सुरक्षित ठिकाणी परत आलो. आमचेकडे दिलेले सरकारी व्हाईस रेकॉर्डर मधील मेमरी कार्ड मध्ये आमचे रेकॉर्ड झालेले संभाषण सापळा पथकाने ऐकुन खात्री केली असता त्यात सुध्दा तलाठी जितेंद्र राठोड यांनी माझेकडे माझे कामाबाबत चर्चा केली व त्यासंबधाने लाच म्हणुन रुपये 4000/- मागणी केल्याची खात्री झाली.लाच मागणीप्रमाणे सापळा अधिकारी राहुल फुला पोलीस निरीक्षक यांनी दिलेल्या सुचनेनुसार मी हजर केलेल्या रक्कम रुपये 4000/- ज्यात आठ नग 500/- रुपये दराच्या नोटा यांना अँन्थ्रासिन पावडर लावुन माझेकडे दिल्यानंतर ती रक्कमतलाठी राठोड यांना लाच म्हणुन देण्याकरीता माझेकडे दिल्यानंतर मी व पंच क्र.1 असे 15.56 वा पुन्हा मुकाई पेट्रोल पंपावर मोटर सायकलने गेलो असतातेथे तलाठी अप्पा नव्हते. म्हणुन मी तलाठी अप्पा राठोड यांना माझे मोबाईल वरुन साधा कॉल केला असता ते बिडकीन पर्यंत पोहचले असे सांगुन त्यांनी माझा कॉल कट केला.म्हणुन सापळा पथकाकडे 16.05 वा आलो, तेव्हा पुर्व सुचनेनुसार पोना सिनकर यांनी माझेकडील व्हाईस रेकॉर्डर बंद केले.त्यानंतर मी तलाठी अप्पा यांना पंच क्र.1 यांचे समक्ष तीन वेळा साधे कॉल केले असता त्यांनी ते न स्विकारल्याने मी पंच क्र.1 यांचेसमक्ष त्यांचा दुसरा व्हॉटसॲप क्र.9112307345 या सेव असलेल्या नंबरवर व्हॉटसअप व्दारेदोन वेळा कॉल करता त्यांनी मला सांगितले की, मी उदया परवा आल्यावर भेटतो, असे बोलुन फोन ठेवुन दिला.वरील कारवाईचा दिनांक 05/10/2023 रोजी सापळा अधिकारी श्री राहुल फुला पो. नि. यांनी ला.प्र.वि.कार्यालय येथे आम्हा सर्वांना नेदुन पंचनामा केला आहे.

दिनांक 05/10/2023 रोजी जेव्हा आम्ही लाच मागणी पडताळणी साठी गेलो तेव्हा तलाठी आप्पा यांनी माझ्यासह पंच क्र.1 यांचे सुध्दा नाव गाव विचारले व सोबत पैसे नसल्याबाबत विचारुन आमचेकडे संशयाने पाहत होता. याचाच अर्थ तलाठी राठोड हा चालाख असुन त्याला लाचमागणी बाबत कशी व काय कारवाई केली जाते याबाबत कल्पना असावी म्हणुनच त्याने मला आजपावेतो स्वत:हुन संपर्क केला नाही किंवा समक्ष भेटला नाही. मी सुध्दा माझे वैयक्तिक सुख दुखाचे व लग्न समारंभाचे कामानिमित्त व्यस्त असल्याने स्वत:हुन तलाठी अप्पा यांना संशय येवु नये करीता संपर्क केला नाही, त्याबाबत पंचनाम्यात विस्तृत कथन केले असुन दि.30/12/2023 रोजी मी त्यांना फोन करुन मागितलेली लाच रक्कम देण्याचे निश्चित केले व दि.05/10/2023 रोजी मी लाच देण्यासाठी हजर केलेली रक्कम रुपये 4,000/- जे मी माझ्याकडे सुरक्षीत ठेवले ते आता सापळा कारवाईसाठी हजर केली.पंचनाम्यातील ठरावानुसार दि.30/12/2023 रोजी मी माझा मोबाईल नंबर 7038135050 यावरुन तलाठी अप्पा जितेंद्र राठोड यांना त्यांचा मोबाईल नंबर 8080326767 यावर कॉल केला असता त्यांनी माझा फोन स्विकारुन ते मला म्हणाले की, हा गौरव बोल ना, वगैरे बोलुन मला काय म्हणतो असे विचारले असता मी त्यांना बोललो की, काही नाही, ते घ्यायला, पेमेंट न्यायला, आले नाही ना तुम्ही ते 4000/- रुपये, असे सांगितले असता ते मला बोलले की, कशाला देता बाबा पेर्मेन्ट बिमेन्ट, राहु दया तुम्हाला खर्चाअर्चाला, ते काम झालं ना तोह काम, असे बोलल्याने मी बर असे बोलुन त्यांना समक्ष भेटण्यास विचारले असता ते बोलले की, संभाजीनगरला मी इकडं हे क्रांतीचौक मधी हं हं, त्यावर मी त्यांना येवु का मी मग का नको, असे बोलत असतांनाच त्यांनी माझा फोन कट केला व मी परत फोन केला असता त्यांनी माझा फोन स्विकारला नाही.

अशाप्रकारे तलाठी अप्पा जितेंद्र विलास राठोड हे माझेकडे त्यांनी मागितलेली लाच रक्कम त्यांना संशय आल्याने स्विकारण्याचे टाळत असुन ते भविष्यात स्विकारणार नाहीत, अशी माझी पुर्ण खात्री झाली आहे म्हणुन त्यांचेवर पुढील कायदेशीर कारवाई करणे आवश्यक आहे.

तरी मी ला.प्र.वि.कडे दिलेल्या तक्रारीनुसार दिनांक 05/10/2023 रोजी 15.16 ते 15.29 वाजे दरम्यान मुकाई पेट्रोल पंप, शेकटा रोड, ता.पैठण येथे लाच मागणी पडताळणी कारवाई दरम्यान पंच क्र.1 श्री.डांबे यांचे समक्ष माझेकडे तलाठी अप्पा श्री जितेंद्र विलास राठोड सजा शेकटा ता.पैठण जि.छत्रपती संभाजीनगर यांनी माझे चुलते विजय धोंडीराम भवर यांचे शेत गट नं.78 शिवार शेकटा येथील विहीर खोदकामातील दगड माती वाहुन नेत असलेल्या वाहनांवर कारवाई न करण्यासाठी पाच हजार रुपये मागुन तडजोड करुन रुपये 4000/- स्विकारण्याचे मान्य केले व सदर लाच रक्कम मागणी प्रमाणे त्याचदिवशी 15.56 ते 16.05 वाजे दरम्यान देण्यासाठी पंच क्र.1

यांचेसह गेलो असता ते संशय आल्याने निघुन गेले व दिनांक 30/12/2023 रोजी सुध्दा फोन केला असता लाचेची रक्कम स्विकारण्यास नकार दिला, म्हणुन माझी तलाठी अप्पा श्री जितेंद्र विलास राठोड सजा शेकटा ता. पैठण जि.छत्रपती संभाजीनगर यांचेविरुध्द लाच मागणी केली करीता कायदेशीर फिर्याद आहे.
माझी वरील फिर्याद संगणकावर टंकलिखीत केली असुन ती मी वाचुन पाहिली असुन ती मी सांगितल्याप्रमाणे व झालेल्या कारवाई प्रमाणे बरोबर व सत्य आहे.
समक्ष ही फिर्याद दिली.
दिनांक 30/12/2023

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):
Ganesh Shivajirao Surwase(I (Inspector)) / API or (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):
गौरव रामकिसन जवर

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

पोलीस ठाणे अमलदार
पोलीस स्टेशन बिडकीन
ता.पैठण, जि.औरंगाबाद (ग्रामीण)